0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २९/०८/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०१२/जा.६१४, दिनांक ३१/०८/२०१२, ११/०९/२०१२ व २७/०९/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २६/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

४) मे. वरदविनायक गॅस एजन्सी ॲडहॉकचे मालक एकनाथ बयाजी गडकरी व जगदीश पटेल उर्फ जगदीश भुराजी चौधरी यांचे दि. २६/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त स्वतंत्र निवेदने.

५) गोदाम मालक तानाजी नारायण पाटील याचे दिनांक २६/०९/२०१२ रोजीचे निवेदन.

६) मे. वरदविनायक गॅस एजन्सी ॲडहॉकचे मालक एकनाथ बयाजी गडकरी यांचे दिनांक १०/१०/२०१२ रोजीचे निवेदन.

७) या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०१२/जा.७४९ दिनांक २९/१०/२०१२.

८) जगदीश पटेल (चौधरी) यांचे दिनांक ०२/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०१२/जा. ५३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १७ /०१/२०१३.

## आ दे श

## (जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २४/०८/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह तानाजी पाटीलवाडी, गाळा क्र. ५, तळवली, नोसिल कंपनीसमोर, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई येथे पोहचले. कंम्पाऊंडला असलेल्या लोखंडी गेटपासून अंदाजे ७० ते ८० फुट अंतरावर डाव्या बाजूच्या गोडाऊनमध्ये पथकाने प्रवेश केला असता, सदर गोदामामध्ये कोणीही व्यक्ती आढळून आली नाही. परंतू गोडाऊनमध्ये काही घरगूती वापराचे गॅस सिलेंडर व काही व्यावसायीक वापराचे गॅस सिलेंडर आढळून आले. तसेच गॅस सिलेंडर असलेला एक टेम्पो व एक मोटार सायकल व इतर साहित्य आढळून

आले. गोडाऊनमध्ये आढळलेल्या घरगुती व व्यावसायीक गॅस सिलेंडरची अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष मोजदाद केली असता, ती खालीलप्रमाणे आढळली.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एचपीसीएल गॅस कंपनीचे घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे पूर्ण भरलेले टेम्पो क्र. एकएम-४३-एफ-४०८७ मध्ये असलेले गॅस सिलेंडर | १३ नग | ३१,४९२.५०/- |
| २ | ऑपरेशन करिता वापरलेले १४.२ किलो वजनाचे घरगुती वापराचे एचपीसीएल कंपनीचे सिलेंडर | ३ नग | ७,२६७.५०/- |
| ३ | एचपीसीएल कंपनीचे १४.२ किलो वजनाचे घरगुती वापराचे रिकामे गॅस सिलेंडर | २२ नग | ४४,०००/- |
| ४ | व्यावसायीक वापराचे १९ किलो वजनाचे पूर्ण भरलेले सिलबंद असलेले इंण्डेन कंपनीचे सिलेंडर | १२ नग | ३३,२४०/- |
| ५ | व्यावसायीक वापराचे १९ किलो वजनाचे पूर्ण भरलेले इंण्डेन कंपनीचे गॅस सिलेंडर ज्याला सिल नाही असे गॅस सिलेंडर | ४ नग | ११,०८०/- |
| ६ | व्यावसायीक वापराचे १९ किलो वजनाचे इंण्डेन कंपनीचे रिकामे गॅस सिलेंडर व कार्यवाहीमध्ये (भरलेले) | २ नग | ५,५४०/- |
| ७ | टेम्पो क्र. एकएम-४३-एफ-४०८७ | १ नग | ६०,०००/- |
| ८ | मोटार सायकल क्र. एमएच-४३-के-२७६५ | १ नग | ४०,०००/- |
| ९ | वजन काटा ५० किलो क्षमतेचा एच.पी. कंपनीचा मार्क असलेला | १ नग | ३,०००/- |
| १० | एलजीचा मोबाईल संच | १ नग | ३,०००/- |
| ११ | लोखंडी रॉड एका गॅस सिलेंडरमधून दुसऱ्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरण्याकरिता वापरात येणारे | ११ नग | १,१००/- |
| | | एकूण | २,३९,७२०/- |

सदर गोडाऊनमध्ये आढळलेला संपूर्ण मुद्देमाल अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जप्त केला. दरम्यान अधिकाऱ्यांनी रबाळे पोलिस ठाणे येथे घटनेची वर्दी दिली. त्यानुसार रबाळे पोलिस ठाणेचे पो.नि. श्री. कोकरे, सपोनिरी श्री. एस.व्ही. सावंत, सपोउपनिरी श्री. कुऱ्हाडे, पोशि के. एस. चव्हाण घटनास्थळी उपस्थित झाले. घटनास्थळी आढळलेला संपूर्ण मुद्देमाल अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष पोलिसांना दाखविला. तसेच सदर कंपाऊंडच्या आंतमध्ये पाटील कंम्पाऊंडचे मालकाचे असलेले कार्यालयात असलेल्या इसमाकडे अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, त्याने त्याचे नांव दादाराव खरात असे असल्याचे सांगितले. तसेच ते तानाजी पाटील कंम्पाऊंडचे मालक यांचे स्वियं सहाय्यक असल्याचे सांगितले. सदरचे गोडाऊन तानाजी पाटील यांनी जगदीश पटेल यांना भाडेतत्त्वावर दिले असून भाडेकरारनामा तानाजी पाटील यांचेकडे असल्याचे सांगितले व तसा जबाब दिला. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष एचपीसीएल गॅस कंपनीचे सदर विभागाचे सेल्स ऑफिसर श्री. अविताभ भुते यांचेशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून

त्यांना छापा घातलेल्या उपरोक्त गोडाऊनमधील अर्धवट भरलेले, रिकामी असलेले, सिल न केलेले आणि घरगुती सिलेंडरमधून गॅस व्यावसायीक वापराच्या सिलेंडरमध्ये भरण्याच्या कार्यवाहीमध्ये असलेले सिलेंडर सुरक्षितरित्या सिल करण्याचे सुचित केले असता, त्यांनी एचपीसीएलचे मेकॅनिक श्री. मंगेश बिष्णोई यांना पाठविले व त्यांनी घटनास्थळी येऊन उपरोक्त सिलेंडर्स सिल केले.

सदर बातमी दिलेले बातमीदार श्री. सुधीर नवले यांचेकडे अधिक चौकशी केली असता, सदरचा थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ हा मेसर्स वरदविनायक गॅस एजन्सी अॅडहॉकच्या एच.पी. गोडाऊन डी मार्टच्या बाजूला, सेक्टर १०, ऐरोली, नवी मुंबई या गोडाऊनमधून भरलेले घरगुती वापराचे गॅस सिलेंडर घेऊन जात असतांना वर नमूद गोडाऊनपासून ते तानाजी पाटील कंम्पाऊंडमधील धाड टाकलेल्या गोडाऊनपर्यंत मी पाठलाग केला आहे, असे पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. त्यानंतर अधिकारी व पंच मिळून मेसर्स वरदविनायक गॅस एजन्सी अॅडहॉकच्या एच.पी. गोडाऊन डी मार्टच्या बाजूला, सेक्टर १०, ऐरोली, नवी मुंबई या पत्त्यावर पोहचले. त्या ठिकाणी उपस्थित असलेले गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबूराम बिष्णोई व सदर एजन्सीच्या मालकाचा मुलगा सागर एकनाथ गडकरी उपस्थित होते. त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी सदर एजन्सीचा लेखाजोखा हे दस्तऐवज एजन्सीचे कार्यालय सिध्दीविनायक पार्क, शॉप क्र. १७, प्लॉट क्र. २१, सेक्टर ८ अे, ऐरोली, नवी मुंबई या पत्त्यावर उपलब्ध होईल असे सांगितले. त्यानंतर अधिकारी व पंच सदर गॅस एजन्सीच्या कार्यालयात पोहचले. सदरच्या गॅस एजन्सीचे गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबूराम बिष्णोई यांचेकडे अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सखोल चौकशी केली असता, त्याने असे सांगितले की, दिनांक २४/०८/२०१२ रोजी दुपारी ०१:०० वाजताचे सुमारास थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ या टेम्पोमध्ये घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे १६ गॅस सिलेंडर अनधिकृतरित्या इसम नामे जगदिश पटेल यांना भरुन त्याने स्वत: दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी ओमप्रकाश बिष्णोई यांची अंगझडती घेतली असता, त्यांचेकडे एलजीचा मोबाईल सेट आढळून आला. सदर मोबाईलची तपासणी केली असता, कॉल रेकॉर्डमध्ये जे.डी. पटेल यास दुपारी ०१:२७ ते सायंकाळी ०५:२७ वाजेपर्यंत अनेकवेळा संभाषण केले असल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष ओमप्रकाश बिष्णोई यांना जगदीश पटेल यांना फोन करण्याचे सुचविले असता, त्यांनी जगदिश पटेल यांना त्यांच्या भ्रमणध्वनीवरुन ०९८२०७९६२२५ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधून अधिकाऱ्यांनी सदरचा भ्रमणध्वनी क्रमांक जगदीश पटेलचाच आहे याची खातरजमा केली. याबाबत ओमप्रकाश बिष्णोई यांनी अधिकाऱ्यांना पंचासमक्ष लेखी जबाब देण्यास नकार दिला. परंतू अधिकाऱ्यांची व पंचांची उपलब्ध पुराव्यांवरुन अशी खात्री पटली की, श्री. जगदीश पटेल यांना थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ यात घरगुती वापराचे एचपीसीएल कंपनीचे भरलेले १४.२ किलो वजनाचे एकूण १६ गॅस सिलेंडर मे. वरदविनायक गॅस एजन्सीच्या वर नमूद गोडाऊनमधून ओमप्रकाश बाबूराम बिष्णोई यांनीच भरुन दिले आहे. त्यानंतर अधिकाऱ्यांनी सदर गॅस एजन्सीच्या दिनांक २४/०८/२०१२ रोजी गॅस सिलेंडरच्या आवक/विक्री व प्रत्यक्ष शिल्लक याबाबतची तपासणी केली असता, ती येणेप्रमाणे,

| भरलेले सिलेंडर | प्रारंभीची शिल्लक | आवक | एकूण | विक्री | अखेरची शिल्लक | गोदामत प्रत्यक्ष शिल्लक साठा | फरक (कमी/जास्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घरगुती | ३०५ | ९०० | १२०५ | ११६४ | ४१ | २५ | (-) १६ |
| औद्योगिक | ५४ | नाही | ५४ | ४ | ५० | ५४ | (+) ४ |

| रिकामे सिलेंडर | प्रारंभीची शिल्लक | आवक | एकूण | विक्री | अखेरची शिल्लक | गोदामत प्रत्यक्ष शिल्लक साठा | फरक (कमी/जास्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घरगुती | २५१ | ११४६+८ T.V.C.=११५४ | १४०५ | ९०० | ५०५ | ५०४ | (-) १ |
| औद्योगिक | ५५ | नाही | ५५ | नाही | ५५ | ८ | (+) ४७ |

सदरच्या गॅस एजन्सीकडे वरील तक्त्यात घरगुती वापराचे (१४.२ कि.ग्रॅ.) साठापुस्तकाप्रमाणे ४१ सिलेंडर गोडाऊनमध्ये शिल्लक असावयास हवे होते. तथापी, अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गोडाऊनमधील प्रत्यक्ष शिल्लक साठ्याची मोजदाद केली असता, घरगुती वापराचे २५ गॅस सिलेंडर तपासणीत आढळून आले आहेत. म्हणजेच १६ घरगुती वापराचे गॅस सिलेंडर कमी आढळून आले. ते १६ गॅस सिलेंडर पाटील कंम्पाऊंडमधील जगदीश पटेल यांच्या गोडाऊनमध्ये जे १६ गॅस सिलेंडर आढळले ते याच एजन्सीने पुरवठा केला असल्याचे सकृतदर्शनी अधिकाऱ्यांना आढळून आल्याने गोडाऊनकिपर यांचा मोबाईल जप्त करण्यात आला. पाटील कंम्पाऊंडमधील अनधिकृत गॅस सिलेंडरचा व्यवसाय करणारा जगदीश पटेल व त्यास सदरचे गोडाऊन गैरधंद्यास वापरण्यास देणारे गोडाऊनचे मालक तानाजी पाटील तसेच गॅस एजन्सीचे मालक एकनाथ बयाजी गडकरी व त्यांचे गॅस एजन्सीमध्ये काम करणारे गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबूराम बिष्णोई या सर्वांनी मिळून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तसेच दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ३, ४, ५, ६ व ७ च्या तरतूदींचा भंग केल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

त्यानंतर अधिकारी व पंच असे सर्व मिळून पाटील कंम्पाऊंडमधील जगदीश पटेल यांच्या गोडाऊनमध्ये उपस्थित राहून तेथील सर्व ५७ गॅस सिलेंडर्सना (घरगुती+व्यावसायीक) पंचांच्या सही शिक्क्याची लेबल्स चिटकविण्यात आली व त्यानंतर सदर गोडाऊन रोलिंग शटर लोखंडी पत्र्याचे खाली खेचून ते दोन्ही बाजूंनी कुलूपाने बंद करुन पंचांच्या सही शिक्क्यानिशी जागीच सिलबंद करण्यात आले.

अशाप्रकारे घरगुती वापराच्या गॅसचे सिलेंडरमधून अनधिकृतरित्या व अत्यंत धोकादायक पध्दतीने गॅस काढून तो व्यावसायीक गॅस सिलेंडरमध्ये भरणे प्रकरणी जगदीश पटेल, अशा अनधिकृत गैरकृत्यास आपले गोडाऊन वापरायला देणारे गाडोऊनचे मालक तानाजी पाटील या गैरकृत्यासाठी एप पी कंपनीचे घरगुती सिलेंडर अनधिकृतरित्या जगदीश पटेल यांना देणारे वरदविनायक गॅस एजन्सीचे मालक एकनाथ बयाजी गडकरी व एजन्सीचे मॅनेजर/गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबुराव बिष्णोई या चौघांनी संगणमत करुन एचपीसीएल व इंण्डेने कंपन्यांचे घरगुती वापरातील शासन अनुदानित दराचे गॅस सिलेंडर अवैध मार्गाने प्राप्त करुन त्याचा काळाबाजार

करण्याच्या उद्देशाने व स्वतःच्या फायद्यासाठी घरगुती सिलेंडरमधून दुसऱ्या कमर्शिअल सिलेंडरमध्ये बेकायदेशिररित्या रिफिलिंग करीत असल्याचे सिध्द झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे दिसून येत असल्याने संबंधितांनी, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९, १० व दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ३, ४, ५, ६ व ७ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०२५/२०१२ दिनांक २५/०८/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०५/०९/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०५/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २६/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस गोडावूनचा मालक तानाजी नारायण पाटील यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. वरदविनायक गॅस एजन्सीचे गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबूराम बिष्णोई यांनी उपस्थित राहून त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून त्यांनी लेखी निवेदन सादर करण्यास नकार दिला. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १०/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. वरदविनायक गॅस एजन्सी ॲडहॉकचे मालक एकनाथ बयाजी गडकरी यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सदर सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. तसेच सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. तथापी, त्यांनी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात पुढील तपासाचा अंतीम अहवाल सादर करणार असल्याचे सांगितले.

तद्नंतर वाचावे क्र. ७ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना पत्र निर्गमित करुन जप्त मुद्देमाल अति ज्वलनशिल असून त्याची विल्हेवाटीचे आदेश पारीत करणे अगत्याचे असल्याने तसेच

अंतीम अहवाला अभावी प्रकरण या कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असल्याने तात्काळ अंतीम अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या. तथापी, सदरचा अहवाल आजमितीस प्राप्त झाले नाही.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २६/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने यातील अटक आरोपी ओमप्रकाश बाबुराम बिश्नोई यांचेकडे अधिक विचारपुस केली असता, त्याने अटक आरोपी नामे १) ओमप्रकाश बरसिंगराम बिश्नोई, २) बजरंग रामचंद्र बिश्नोई, ३) श्रवण बगडुराम बिश्नोई, ४) ओमप्रकाश गिरधारीराम बिश्नोई, ५) महेश भगवानाराम बिश्नोई, यांचे सहाय्याने ते स्वत:च कस्टमरच्या नावाने गॅसची बुकिंग करुन गॅस जगदीश चौधरी उर्फ पटेल, यास त्याच्या नोसील नाका, तळवली, नवी मुंबई येथील गोडावूनमध्ये नेऊन देत असल्याबाबत सांगितले. तसेच सदर व्यवसायात एच.पी.गॅस एजन्सीचे मॅनेजर ओमप्रकाश कान्हाराम मांजू, यांचा देखील समावेश असल्याबाबत सांगितले. त्यानंतर ओमप्रकाश बिश्नोई, यांचेसह वर नमुद डिलेव्हरी बॉय व एच.पी. गॅस एजन्सीचे मॅनेजर, यांचा शोध घेऊन त्यांना पोलिस ठाण्यात आणून त्यांचेकडे विचारपुस केली असता, त्यांचा सदर गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे जगदीश चौधरी उर्फ पटेल यास अटक करुन त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने इंडेण्न कंपनीचे सिलेंडर त्याचा सदर व्यवसायातील भागीदार किशोरसिंग राजपुरोहित, याचे ओळखीने नेरुळ येथील इंडेण्न कंपनीचे गॅस एजन्सीमधून जयकिशन बिश्नोई, श्यामलाल बिश्नोई व सोनाराम बिश्नोई, यांचेकडून आणलेबाबत सांगितले. तसेच गुन्ह्याच्या घटनास्थळी जप्त करण्यात आलेली मोटार सायकल व टेम्पो, याबाबत माहिती काढली असता, सदर दोन्ही गाड्या जगदीश चौधरी उर्फ पटेल, याचे नावावर असल्याबाबत लेखी पत्राद्वारे प्रादेशिक परिवहन अधिकारी, वाशी, यांनी पत्राद्वारे कळवलेली आहे. इंण्डेन गॅस एजन्सीचे सोनाराम बिश्नोई हे त्यांचे रहाते पत्त्यावर मिळून आले, त्यांना पोलिस ठाण्यात आणून त्यांचेकडे केलेल्या चौकशीत त्यांनी किशारे राजपुरोहित व जगदीश चौधरी, यांना यापूर्वी सिलेंडर दिले असल्याबाबत कबुली दिल्याने त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. यातील पाहिजे आरोपी किशोरसिंग राजपुरोहित यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. तसेच यातील पाहिजे आरोपीत यांचा शोध घेऊन सदर गुन्ह्यात अटक करीत आहोत. सदर गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे, असे नमूद केले आहे.

जगदीश पटेल उर्फ जगदीश भुराजी चौधरी यांचे दिनांक २६/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्याला या कार्यालयातून पाठविलेले पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०१२/जा.६४३ शनिवार दि.२२/०९/२०१२ रोजी तो तळोजा येथील कारागृहातून बाहेर पडल्यावर मिळाले व त्याला वकील नियुक्त

कण्यासाठी वेळ मिळाला नाही. तरी त्याला वकील नियुक्त करुन त्याचे म्हणणे मांडण्यासाठी वेळ मिळावा अशी विनंती केली आहे..

गोदाम मालक तानाजी नारायण पाटील याचे दिनांक २६/०९/२०१२ रोजीचे निवेदनात, तो तळवली नाका, नवी मुंबई येथे राहत असून त्याने भाडेतत्त्वावर दिलेल्या गाळा नं. ४ वर आपण धाड टाकून श्री. जगदीश पटेल चौधरी हे अवैधरित्या गॅस व्यवसाय करीत असल्याच्या संशयावरुन त्याला त्याच्या मुद्देमालासकट पकडले आहे. सदर गाळा त्याने त्याला सहा महिन्याच्या करार पध्दतीने भाडेतत्त्वावर दिला होता. तो गॅस शेगड्या रिपेरिंग करण्यासाठी परंतू त्या गाळ्यामध्ये आपल्या म्हणण्यानुसार तो गॅसचा गैर वापर करत होता. त्याचा त्या बाबतीत काहीही संबंध नाही. श्री. जगदिश पटेल चौधरी याला पोलिसांनी अटक केली आहे. गुन्ह्याचे स्वरुप आपल्याला समजले असेल. त्याचा गाळा लवकरात लवकर सिल काढून त्याच्या ताब्यात देण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

दिनांक १०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. वरदविनायक गॅस एजन्सी ॲडहॉकचे मालक एकनाथ बयाजी गडकरी यांनी युक्तीवाद केला की, ते नमूद गॅस एजन्सी ॲडहॉक पध्दतीने मागील ३ वर्षापासून ऐरोली येथे कार्यरत असून त्यांचे ओमप्रकाश बिश्नोई नामे नोकरास व इतर नोकरास दिनांक २७/०८/२०१२ रोजी जीवनावश्यक वस्तू कायद्याचा भंग केल्याने त्यांचेवर फौजदारी कारवाई करुन अटक करण्यात आली आहे. दिनांक ३०/०८/२०१२ रोजी मे. वरलविनायक या गॅस एजन्सीचे मालक म्हणून सत्र न्यायालय, ठाणे येथे अटकपूर्व जामिनसाठी अर्ज केलेला आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०५/०९/२०१२ रोजीच्या आदेशान्वये अटकपूर्व जामिन मंजूर झाले आहे. सदरचे गोदाम हे तानाजी पाटील यांचे मालकीचे असून तसेच नमूद गुन्ह्यातील टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ हा टेम्पो त्यांचा अथवा त्यांचे नोकर यांच्यापैकी कोणाचाही मालकीचा नाही. त्यामुळे सदर गोदाम व टेम्पोशी त्यांचा काहीही संबंध नाही. दिनांक २४/०८/२०१२ रोजीच्या तपासणीमध्ये त्यांचा सिलेंडरचा साठा हा बरोबर असताना पथकाने घरगुती वापराचे १६ सिलेंडर कमी असल्याचे दर्शविले आहे. तथापी, सदर १६ सिलेंडर दोषयुक्त असल्याने तसेच ते त्यांच्या गोदामात असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. सदर प्रकरणी नमूद गुन्ह्याशी त्यांचा काहीही संबंध नसून जप्त करण्यात आलेला सिलेंडरचा साठा हा त्यांचा नसल्याने शासनजमा करण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

जगदीश पटेल (चौधरी) यांचे दिनांक ०२/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, तो गणेश नगर, चिंचपाडा, नवी मुंबई येथे गेल्या २० वर्षापासून राहण्यास आहे. दिनांक २४/०८/२०१२ रोजी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्यामार्फत पोलिस स्टेशन, रबाळे, नवी मुंबई च्या हद्दीमध्ये धाड टाकून सदर ठिकाणा वरुन प्रशासनामार्फत काही गॅस सिलेंडर व त्याचा टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ व मोटार सायकल क्र. एमएच-४३-के-२७६५ ही वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्याचा व त्याच्या वाहनांचा सदर घडलेल्या अवैध व्यापाराशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. सदर कार्यवाहीमध्ये अत्यावश्यक वस्तू अधिनियमानुसार त्याचा वरील नमूद टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ व मोटार सायकल क्र. एमएच-४३-के-२७६५ ही वाहने जप्त करण्यात आली आहेत.

वास्तविक पाहता सदरच्या प्रकरणाशी त्याचा किंवा त्याच्या वाहनाचा कोणताही संबंध नाही. सदर कार्यवाही दिनांक २४/०८/२०१२ रोजी करण्यात आली. त्या दिवशी तो त्याच्या मुळ गावी होता. तरी देखील संशयावरुन पोलिसांनी त्याला सदर गुन्ह्यात अटक केली. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा या आपल्या कार्यालयामार्फत त्याला प्रत्यक्ष उपस्थित राहून त्याच्या वर नमूद वाहनासंबंधी त्याचे म्हणणे सादर करण्याबाबत रबाळे पोलिस स्टेशन, द्वारे सुचविण्यात आले होते. परंतू तो आजारी असल्याकारणामुळे सदर सुनावणी दरम्यान आपल्या समक्ष हजर राहू शाकला नाही. तरी मे. साहेबांना विंनती की, त्याचे सदर वर नमूद म्हणणे/जबाब दाखल करुन घ्यावे. सदरचे प्रकरण हे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, नवी मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे. तसेच सदर केसचा निकाल लागण्यासाठी अजून बराच वेळ जाणार आहे. सदर वाहने ही आपल्या कार्यालयीन आदेशानुसार जप्त करण्यात आलेली आहेत. तसेच सदर वर नमूद वाहने जप्त अवस्थेत पडून राहिल्यास ते खराब होऊन त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. मे. साहेबांनी आदेश केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास तो तयार आहे. तरी वरील नमूद टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ व मोटार सायकल क्र. एमएच-४३-के-२७६५ त्याला लवकरात लवकर देण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २४/०८/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह तानाजी पाटीलवाडी, गाळा क्र. ५, तळवली, नोसिल कंपनीसमोर, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई येथील गोदामामध्ये धाड टाकली असता, सदर गोडाऊनमध्ये काही घरगूती वापराचे गॅस सिलेंडर व काही व्यावसायीक वापराचे गॅस सिलेंडर आढळून आले. सदर ठिकाणी घरगुती वापराच्या गॅसचे सिलेंडरमधून अनधिकृतरित्या व अत्यंत धोकादायक पध्दतीने गॅस काढून तो व्यावसायीक गॅस सिलेंडरमध्ये भरणे प्रकरणी जगदीश पटेल, अशा अनधिकृत गैरकृत्यास आपले गोडाऊन वापरायला देणारे गाडोऊनचे मालक तानाजी पाटील या गैरकृत्यासाठी एप पी कंपनीचे घरगुती सिलेंडर अनधिकृतरित्या जगदीश पटेल यांना देणारे वरदविनायक गॅस एजन्सीचे मालक एकनाथ बयाजी गडकरी व एजन्सीचे मॅनेजर/गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबुराव बिष्णोई या चौघांनी संगणमत करुन एचपीसीएल व इंण्डेने कंपन्यांचे घरगुती वापरातील शासन अनुदानित दराचे गॅस सिलेंडर अवैध मार्गाने प्राप्त करुन त्याचा काळाबाजार करण्याच्या उद्देशाने व स्वतःच्या फायद्यासाठी घरगुती सिलेंडरमधून दुसऱ्या कमर्शिअल सिलेंडरमध्ये बेकायदेशिररित्या रिफिलिंग करीत असल्याचे सिध्द झाल्याने, संबंधितांविरुध्द रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०२५/२०१२ दिनांक २५/०८/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन एचपीसीएल गॅस कंपनीचे घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे पूर्ण भरलेले तसेच रिकामी, व्यावसायीक वापराचे

१९ किलो वजनाचे इंण्डेन कंपनीचे भरलेले तसेस रिकामी सिलेंडर, १ टेम्पो, १ मोटार सायकल व इतर असा एकूण २,३९,७२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रस्तूत गुन्ह्यात, मे. वरदविनायक गॅस एजन्सी ॲडहॉकचे मालक एकनाथ बयाजी गडकरी यांनी केलेल्या खुलाशात, सदर गोदाम व टेम्पो यांच्याशी त्यांचा काहीही संबंध नसुन सदर प्रकरणी नमूद गुन्ह्याशी त्यांचा काहीही संबंध नसल्याने जप्त करण्यात आलेला सिलेंडरचा साठा हा शासनजमा करण्यास त्यांची हरकत नसल्याचे सांगितले. तथापी, सदर गुन्हा नोंद प्रकरणी अधिकारी व पंच सदर गॅस एजन्सीच्या कार्यालयात पोहचले असता सदरच्या गॅस एजन्सीचे गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबूराम बिष्णोई यांनी अधिकाऱ्यांकडून पंचासमक्ष केलेल्या सखोल चौकशीत दिनांक २४/०८/२०१२ रोजी दुपारी ०१:०० वाजताचे सुमारास थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ या टेम्पोमध्ये घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे १६ गॅस सिलेंडर अनधिकृतरित्या इसम नामे जगदिश पटेल यांना त्यांने स्वत: भरुन दिल्याचे कबुल केले आहे. तसेच दिनांक २४/०८/२०१२ रोजी मे. वरदविनायक गॅस एजन्सी ॲडहॉक यांचे मार्फत वितरण दर्शविलेल्या घरगुती गॅस ग्राहकांची यादी प्राप्त करुन त्या अनुषंगाने या कार्यालयाच्या फिरत्या पथकामार्फत एकूण ११५४ गॅस ग्राहकांच्या गृहभेटी देवून केलेल्या चौकशीत त्यापैकी एकूण २७६ गॅस ग्राहकांनी त्यांना सिलेंडर्स मिळाले नसल्याचे तसेच २२ गॅस ग्राहक दिलेल्या पत्यावर रहात नसल्याचे आढळून आले. म्हणजेच एकुण २९८ गॅस ग्राहकांची मागणी नोंदविली नसतांना त्यांच्या नावे खोटी मागणी नोंदवून सदरचे एकुण २९८ घरगुती वापराचे सिलेंडर्स हे काळाबाजारीने विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने यातील अटक आरोपी ओमप्रकाश बाबुराम बिश्नोई यांचेकडे अधिक विचारपुस केली असंता, त्याने अटक आरोपी नामे १) ओमप्रकाश बरशिंगराम बिश्नोई, २) बजरंग रामचंद्र बिश्नोई, ३) श्रवण बुधाराम बिश्नोई, ४) ओमप्रकाश गिरधारीराम बिश्नोई, ५) महेश भगवानाराम बिश्नोई, यांचे सहाय्याने ते स्वत:च कस्टमरच्या नावाने गॅसची बुकिंग करुन गॅस जगदीश चौधरी उर्फ पटेल, यास त्याच्या नोसील नाका, तळवली, नवी मुंबई येथील गोडावूनमध्ये नेऊन देत असल्याबाबत सांगितले. तसेच सदर व्यवसायात एच.पी.गॅस एजन्सीचे मॅनेजर ओमप्रकाश कान्हाराम मांजू यांचा देखील समावेश असल्याबाबत सांगितले. सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे जगदीश चौधरी उर्फ पटेल यास अटक करुन त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने इंडेन कंपनीचे सिलेंडर त्याचा सदर व्यवसायातील भागीदार किशोरसिंग राजपुरोहित, याचे ओळखीने नेरुळ येथील इंडेण्न कंपनीचे गॅस एजन्सीमधून जयकिशन बिश्नोई, श्यामलाल बिश्नोई व सोनाराम बिश्नोई, यांचेकडून आणलेबाबत सांगितले. सबब, उपरोक्त संबंधितांनी संगणमत करुन स्वत:च्या फायद्याकरिता घरगुती वापराचे गॅस सिलेंडर्स काळ्या बाजाराने अनधिकृतरित्या खरेदी व विक्री करुन ते व्यवसायीक कारणासाठी रिफिलिंग करुन त्याची अवैध वाहतूक व विक्री केल्याचे निष्पन्न होत असल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने,

जप्त करण्यात आलेला घरगुती व व्यावसायीक वापराचा संपूर्ण सिलेंडरचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तथापी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २३/०५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये " The seized LPG cylinder is a property of the Oil companies and therefore the premise of depositing money against the seized cylinder is not possible " असे नमूद असल्याने विविध धाडींमध्ये जप्त करण्यात आलेल्या विविध तेल कंपन्यांचा गॅस सिलेंडरचा साठा हा संबंधित तेल कंपन्यांची मालमत्ता आहे. सबब, शासनजमा केलेला गॅस सिलेंडरच्या साठ्याची आकारण्यात आलेली रक्कम वसूल करणे शक्य नसल्याने सदरचा जप्त गॅस सिलेंडरचा साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे मदतीने मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. व मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

सदर गुन्ह्यामधील मुख्य आरोपी जगदीश पटेल (चौधरी) यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. तथापी, टपालामार्फत त्यांनी सादर केलेल्या निवेदनात अत्यंत बेजबाबदारपणे नमूद गुन्ह्यात त्यांचा संबंध नसल्याचे सांगून सदर प्रकरणी जप्त असलेले टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ व मोटार सायकल क्र. एमएच-४३-के-२७६५ ही दोन्ही वाहने त्यांच्या मालकीची असल्याचे सांगून ती योग्य अटी व शर्तीवर परत देण्याची विनंती केली. वास्तवीक पाहता जगदीश पटेल यांचा नमूद गुन्ह्यात संबंध नसल्यास सदरची दोन्ही वाहने घटनास्थळी मिळून येणे तसेच गोदाम मालक तानाजी नारायण पाटील यांनी सदरचा गाळा नं. ४ हा जगदीश पटेल चौधरी यास सहा महिन्याच्या करार पध्दतीने भाडेतत्त्वावर दिल्याचे कबूल करणे म्हणजेच जगदीश पटेल हा खोटे निवेदन सादर करुन या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. सदर प्रकरणी जगदीश पटेल याने त्याच्या अनधिकृत व्यवसायासाठी दोन्ही वाहनांचा अवैध वाहतुकीकरीता वापर केल्याचे सिध्द होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टेंम्पो व मोटार सायकलची प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकांस परत करण्याचा अथवा वाहनाचे मालक तेवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरची दोन्ही वाहने जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत गुन्हयात उर्वरीत जप्त करण्यात आलेला एच पी कंपनीचा मार्क असलेला ५० किलो क्षमतेचा वजन काटा पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

तसेच नमुद गुन्हयातील जप्त करण्यात आलेल्या एका गॅस सिलेंडरमधुन दुसऱ्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरण्याकरीता वापरात येणारे ११ नग लोखंडी रॉड या वस्तु गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य म्हणुन सदरच्या अवैध व्यवसायासाठी वापरण्यात आलेल्या असल्याने सदर मुद्देमाल हा किरकोळीने विक्री केल्यास त्याचा पुन्हा गैरवापर होण्याची साशंकता आहे. सबब, सदरचा मुद्देमाल हा कायमस्वरुपी जप्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०२५/२०१२ दिनांक २५/०८/२०१२ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) जप्त करण्यात आलेले एचपीसीएल कंपनीचे घरगुती वापराचे एकुण ३८ व मे. इंडियन ऑईल कंपनीचे व्यावसायीक वापराचे एकुण १८ गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) उपरोक्त शासनजमा करण्यात आलेल्या संपुर्ण घरगुती व व्यावसायीक वापराच्या गॅस सिलेंडर्सचा साठा हा पोलिसांनी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांचे मदतीने मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. व मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. या संबंधित तेल कंपन्यांस बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

३) जप्त करण्यात आलेला एच पी कंपनीचा मार्क असलेला ५० किलो क्षमतेचा वजन काटा पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) उर्वरीत जप्त करण्यात आलेल्या एका गॅस सिलेंडरमधुन दुसऱ्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरण्याकरीता वापरात येणारे ११ नग लोखंडी रॉड व एलजी कंपनीचा मोबाईल संच या वस्तु कायमस्वरुपी जप्त करुन शासनजमा करण्यात यावी.

५) जप्त करण्यात आलेले टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ व मोटार सायकल क्र. एमएच-४३-के-२७६५ ही दोन्ही वाहने शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनांची बाजारमुल्या एवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

६) अथवा वाहनांचे मालक सदरची प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) तानाजी पाटील, गोडाऊनचा मालक
२) जगदीश पटेल
३) गोडाऊनकिपर ओमप्रकाश बाबूराम बिष्णोई
४) मेसर्स वरदविनायक गॅस एजन्सी ॲडहॉकचे मालक एकनाथ बयाजी गडकरी
५) टेम्पो क्र. एमएच-४३-एफ-४०८७ चा मालक
६) मोटार सायकल क्र. एमएच-४३-के-२७६५ चा मालक

(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३) विभागीय व्यवस्थापक, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
४) विभागीय व्यवस्थापक, मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
७) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.